

ज्ञान विज्ञान स्वावलंबन चारित्र्य

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ,

संचलित



# लोकनेते गोपिनाथजी मुंडे
# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मंडणगड, जि. रत्नागिरी.

(मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न)

'नॅक' पुनर्मूल्यांकित 'ब' श्रेणी

ISO मानांकन 9001: 2008

BEST COLLEGE AWARD 2019-20

स्थापना १५ जून १९९६


Website : https://lgmacs.edu.in/

e-mail : maccmandangad@reddifmail.com

Tel. No.: (02350)
225535 / 299017


# माहिती पुस्तिका

(वरिष्ठ महाविद्यालय)

२०२३-२०२४

## महाविद्यालयाबाबत थोडेसे

छ. शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, परमपूज्य साने गुरूजी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली मंडणगडच्या भूमीत असलेली शिक्षण प्रसाराची उणिव दुर करुन त्यास चालना देण्यासाठी सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या कर्मवीर भिकूजी उर्फ दादा इदाते आणि अन्य प्रभूर्तीनी १५ जून १९९६ रोजी मंडणगड येथे संस्थेचे पहिले कनिष्ठ (वाणिज्य) व तालुक्यातील पहिले वरिष्ठ (कला व वाणिज्य) महाविद्यालय सुरू केले. त्यामुळे मंडणगड तालुक्यातील 'लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान' या महाविद्यालयाच्या रूपाने शिक्षण प्रसार सुरु झाला. यंदाचे शैक्षणिक वर्षे २०२३–२४ हे या महाविद्यालयाचे २७ वे वर्ष असून मागील २६ वर्षात सुमारे १६००/१७०० विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केलेली आहे. शै. वर्षे २०१०–११ पासून विज्ञान शाखेस प्रारंभ झाल्यामुळे तालुक्यातील विज्ञान शिक्षणाची वानवा दूर होण्यास मदत झाली आहे.

२०१७–१८ या शैक्षणिक वर्षामध्ये ११ वी विज्ञान वर्ग सुरु करण्यात आला आहे.

**२०१९–२० या वर्षी आपल्या महाविद्यालयाने ISO मानांकन प्राप्त केलेले असून असे मानांकन मिळवणारे हे जिल्हयातील पहिलेच वरिष्ठ महाविद्यालय आहे. तसेच महाविद्यालयास २०१९–२० चा मुंबई विद्यापीठाचा (ग्रामिण विभाग) BEST COLLEGE AWARD प्राप्त झाला आहे .**

महाविद्यालयाला नॅक NAAC संस्थेकडून पुनर्मूल्यांकनानुसार 'बी+' श्रेणी मिळालेली आहे.

महाविद्यालयामध्ये प्रथमच Digital Classroom] Audio Visual Room असे उपक्रम सुरु झालेले आहेत. तसेच वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन संस्थेने पहिल्या मजल्यावर नविन प्रशस्त वर्ग खोल्या आणि नवीन स्वतंत्र ग्रंथालय व विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिका खोली बांधकाम पूर्ण केलेले आहे

विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी महाविद्यालयात वेळोवेळी अनेक राष्ट्रीय, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा विषयक उपक्रम राबविले जातात. विद्यार्थिनींसाठी महिला वसतिगृहास प्राध्यान्य दिलेले आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या क्रीडाविषयक कौशल्यास संधी मिळावी म्हणून प्रशस्त मैदान आणि जिमखाना याची सुविधा प्राप्त करुन दिलेली आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास हे उद्दिष्ट लक्षात घेऊन महाविद्यालयातर्फे शिक्षणाबरोबरच शिक्षणपुरक व शिक्षणेतर उपक्रम राबविले जातात. आणि यामुळेच महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी कला व क्रीडा क्षेत्रात नावलौकिक प्राप्त करत आहेत. महाविद्यालयाच्या विकासासाठी सर्व स्तरातून सहकार्य व प्रतिसाद मिळत असतो.

## लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मंडणगड.

# प्रवेश - प्रक्रिया

दि. ०३ जून २०२३ पासून व्दितीय व तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गांची प्रवेश प्रक्रिया सुरू होईल आणि इ. १२ वी व इ. १० वी चा निकाल लागल्यानंतर लगेचच प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान आणि इ. ११ वी कला, वाणिज्य व विज्ञान वर्गांची प्रवेश प्रक्रिया सुरू होईल.

आपला प्रवेश अर्ज मुंबई विद्यापीठाच्या वेबसाइटवर जाऊन ऑनलाईन प्रणालीद्वारे बिनचूक भरून त्याची प्रत (College copy) आवश्यक त्या सर्व कागद पत्रांसह महाविद्यालयात जमा करावी. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज भरताना आपला USER ID आणि Passward बिनचूकपणे लक्षात ठेवावा. यामध्ये काही अडचण असल्यास प्रवेश समिती अथवा महाविद्यालयाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान प्रवेश :**

या वर्गासाठी महाविद्यालयात प्रवेश घेताना अर्जासोबत खालीलप्रमाणे पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. अलीकडील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (४ फोटो )

२. १२ वी उत्तीर्ण गुणपत्रकाची मूळप्रत व चार झेरॉक्स प्रती आणि १२ वी च्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची मूळ प्रत व चार झेरॉक्स प्रती.

३. इ. १० वी च्या गुणपत्रकाची १ झेरॉक्स प्रत, आधार कार्डाची १ झेरॉक्स प्रत, रेशन कार्डाची १ झेरॉक्स प्रत

४. प्रवेश अर्जासोबत दिलेला प्रथम व व्दितीय सत्र परीक्षेचा फॉर्म.

५. मागासवर्गीय असल्यास जातीच्या दाखल्याची दोन साक्षांकित झेरॉक्स प्रती व तहसिलदार कार्यालयातील उत्पन्नाच्या दाखल्याच्या (सन २०२२-२३ या वर्षाचा ) दोन साक्षांकित झेरॉक्स प्रती.

६. शैक्षणिक वर्षात खंड पडत असल्यास स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र.

७. जर फी सवलत घेत असाल तर राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती / पी.टी.सी. / एस्.एस्.टी.सी. / माजी सैनिक पाल्य इत्यादींपैकी आवश्यक असलेला सवलतींचा अर्ज.

**व्दितीय/तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान प्रवेश :**

या वर्गासाठी महाविद्यालयात प्रवेश घेताना अर्जासोबत खालीलप्रमाणे पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. अलीकडील पासपोर्ट आकारचे छायाचित्र (४ फोटो ) जोडावे.

२. व्दितीय वर्षासाठी प्रथम वर्षाच्या गुणपत्रिकेच्या तीन झेरॉक्स प्रती आणि तृतीय वर्षासाठी प्रथम व व्दितीय वर्षाच्या गुणत्रिकेच्या प्रत्येकी तीन झेरॉक्स प्रती जोडाव्यात.

३. व्दितीय वर्षासाठी प्रवेश अर्जासोबत दिलेला प्रथम व व्दितीय सत्र परिक्षेचा फॉर्म.

४. जर विद्यार्थी अन्य महाविद्यालयातून आलेला असेल तर गुणपत्रकाची मूळ प्रत व तीन झेरॉक्स प्रती तसेच पूर्वीच्या महाविद्यालयातील ना-हरकत दाखल्याची मूळ प्रत जोडावी.

५. जर विद्यार्थी मुंबई विद्यापीठाऐवजी इतर विद्यापीठाचा असेल तर मुंबई विद्यापीठाचा पात्रता दाखला.

६. फी सवलत लागू असल्यास संबंधीत फी सवलतीचा अर्ज कार्यालयातून घेवून भरणे.

७. मागासवर्गीय असल्यास जातीच्या दाखल्याची दोन साक्षांकित झेरॉक्स प्रती जोडाव्यात.

८. शैक्षणिक वर्षात खंड पडत असल्यास स्टॅम्प पेपरवर स्वयंघोषणापत्र.

९. महाविद्यालयाच्या ओळखपत्रासाठी अलिकडील एक पासपोर्ट आकाराचा फोटो.

**शैक्षणिक सत्रः**

महाविद्यालयाचे शैक्षणिक कामकाज हे मुंबई विद्यापीठाने नेमून दिलेल्या नियमानुसार चालते. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ साठीचे शैक्षणिक सत्र पुढीलप्रमाणे आहे.

प्रथम सत्र दिनांक १३/०६/२०२३ पासून सुरु.

या महाविद्यालयात पुढील अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्यात येईल.

**प्रवेशाच्यावेळी महाराष्ट्र शासन/मुंबई विद्यापीठ मुंबई यांजकडून येणाऱ्या परिपत्रकाप्रमाणे विविध वर्गासाठी प्रवेशामध्ये आरक्षण अंमलबजावणी करण्यात येण्यात येते.**

**बी. ए. पदवी अभ्यासक्रम**

प्रथम वर्ष कला (F. Y. B. A.)

द्वितीय वर्ष कला (S. Y. B. A.)

तृतीय वर्ष कला (T. Y. B. A.)

**बी. कॉम. पदवी अभ्यासक्रम**

प्रथम वर्ष कॉम. (F. Y. B. Com.)

द्वितीय वर्ष कॉम. (S. Y. B. Com.)

तृतीय वर्ष कॉम. (T. Y. B. Com.)

**बी. एस्सी पदवी अभ्यासक्रम**

प्रथम वर्ष विज्ञान (F. Y. B. Sc.)

द्वितीय वर्ष विज्ञान (S. Y. B. Sc.)

तृतीय वर्ष विज्ञान (T. Y. B. Sc.)

**शैक्षणिक अभ्यासक्रम :**

**प्रथम वर्ष कला :**

अनिवार्य विषय : १. पायाभूत अभ्यासक्रम (एफ.सी.)
२. कम्युनिकेशन स्किल इन इंग्लीश
३. मराठी

ऐच्छिक विषय :

| | |
|---|---|
| अर्थशास्त्र | मराठी |
| इतिहास | भूगोल |
| हिंदी | अर्थशास्त्र |

**व्दितीय वर्ष कला :**

अनिवार्य विषय : १. पायाभूत अभ्यासक्रम (एफ.सी.)
२. Business Communication

ऐच्छिक विषय :

| | |
|---|---|
| १. अर्थशास्त्र पेपर २ आणि ३. | १. भूगोल पेपर २ आणि ३ |
| २. इतिहास पेपर २ आणि ३. | २. मराठी पेपर २ आणि ३ |
| ३. हिंदी पेपर पेपर २ आणि ३ | |

टिप :– ऐच्छिक विषयापैकी प्रथम वर्षातीलच विषय हे द्वितीय वर्ष कलामध्ये कायम राहतात.

**तृतीय वर्ष कला :**

प्रथम व द्वितीय वर्ष कला वर्गात अभ्यासलेल्या ३ ऐच्छिक विषयांपैकी कोणत्याही दोन विषयांची निवड करता येते.

| | |
|---|---|
| १. अर्थशास्त्र पेपर ४, ५, ६. | ४. भूगोल पेपर पेपर ४, ५, ६. |
| २. इतिहास पेपर ४, ५, ६. | ५. मराठी पेपर ४, ५, ६. |
| ३. हिंदी पेपर पेपर ४, ५, ६. | ६. अर्थशास्त्र (Six Unit). |
| ७. मराठी पेपर (Six Unit). | |

**FACULTY OF COMMERCE:**

B. Com.: A Student who has passed H. S. C. (Commerce or MCVC, A/C & Auditing Purchasing & store keeping) Examination is eligible for admission to F. Y. B. Com.

**First Year B. Com:**

Compulsory Subject: 1. Foundation Course
2. Business Communication
3. Business Economics
4. Environmental Studies
5. Mathematical & Statistical Technique
6. Commerce Paper I
7. Accountancy & Financial Management

**Second Year B. Com:**

Compulsory Subject: 1. Foundation Course
2. Business Economics
3. Commerce Paper I & II
4. Business Law
5. Financial Accounting & Auditing
6. Advertising
7. Accountancy & Financial Management

**Third Year B. Com:**

Compulsory Subject: 1. Business Economics
2. MHRM (Commerce)
3. Marketing Research
4. Export Marketing
5. Financial Accounting & Auditing (Financial Accounting)
6. Financial Accounting & Auditing (Cost Accounting)

**FACULTY OF SCIENCE:**

**First Year B. Sc.:**

Compulsory Subject: Foundation Course I

| **Group 'A'** | **Group 'B'** |
|---|---|
| Chemistry | Chemistry |
| Physics | Botany |
| Mathematics | Zoology |

**Second Year B. Sc.:**

Compulsory Subject : Foundation Course II

| **Group 'A'** | **Group 'B'** |
|---|---|
| Chemistry | Chemistry |
| Physics | Botany / Zoology |

**Third Year B. Sc.:**

1. Entire six unit for Chemistry
2. Three Unit of Botany and Three unit of Chemistry

## 4 A. FEES STRUCTURE FOR THE ACADEMIC YEAR 2023-24 FOR PAYING STUDENTS

| Sr. No. | DETAILS OF FEES | ARTS | | | COMMERCE | | | SCIENCE | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | F.Y. | S.Y. | T.Y. | F.Y. | S.Y. | T.Y. | F.Y. | S.Y. | T.Y. |
| 1. | Tuition Fees | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 |
| 2. | Library Fees | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| 3. | Gymkhana Fees | 400 | 400 | 400 | 400 | 400 | 400 | 400 | 400 | 400 |
| 4. | Other Fee / Extra Curricular Activity | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 |
| 5. | Enrollment Fee | 220 | 0 | 0 | 220 | 0 | 0 | 220 | 0 | 0 |
| 6. | Exam. Fee | 2020 | 2020 | 2270 | 2020 | 2020 | 2270 | 2020 | 2020 | 2270 |
| 7. | Admi. Processing | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| 8. | Disaster Relief Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 9. | Utility Fees | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 |
| 10. | Magazine Fees | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 11. | ID & Library card Fee | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 12. | Group Insurance Fee | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 |
| 13. | Student Welfare Fund | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 14. | Development Fund | 500 | 500 | 500 | 500 | 500 | 500 | 500 | 500 | 500 |
| 15. | Vice-Chancellor Fund | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 16. | Uni. Sports & Cult. Activity | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 17. | E-charges | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 18. | Project Fee | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 19. | E-Suvidha | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 20. | Alumani Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 21. | N.S.S. Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 22. | Laboratory Fee | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 800 | 800 | 800 |
| 23. | Caution Money ( Refundable ) | 150 | 0 | 0 | 150 | 0 | 0 | 150 | 0 | 0 |
| 24. | Library Deposit ( Refundable ) | 250 | 0 | 0 | 250 | 0 | 0 | 250 | 0 | 0 |
| 25. | Laboratory Deposit ( Refundable ) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 400 | 0 | 0 |
| | Total Rupees | 5685 | 5065 | 5065 | 5685 | 5065 | 5065 | 6265 | 5245 | 5425 |

N.D. All Fees as per the University Circular No. CONCOL/Fee/292 of 2008 dated 7th July 2008

टिप :– वरील फी तक्त्यातील फी मध्ये महाराष्ट्र शासन, मुंबई विद्यापीठ, मुंबई कडून कोणतेही बदल झाल्यास सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहतील.

७) अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती :– केंद्रीय अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाने मुस्लीम, शीख, बौध्द, ख्रिश्चन व पारशी या समाजातील इयत्ता अकरावी, बारावी व उच्च शिक्षण अभ्याक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांकरीता पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना लागू केलेली आहे.

विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी मुंबई विद्यापीठाकडील प्रचलित परिपत्रकाप्रमाणे आवश्यक ती फी भरून घेऊन प्रवेश निश्चित केला जातो.

८) विद्यार्थी सहाय्यता निधी :– यामध्ये गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना आपल्या किरकोळ गरजा भागविण्यासाठी आर्थिक मदत मिळते. यासाठी विहित नमुन्यात अर्ज सादर करावा लागतो.

९) प्राचार्य संघटना सहाय्यता निधी :– मुंबई विद्यापीठ प्राचार्य संघटनेकडून गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक स्वरूपात मदत मिळते. या संदर्भात सविस्तर माहिती करीता कार्यालयात संपर्क साधावा.

फक्त अनुसूचित जातीच्या (एस. सी.) विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीकरिता पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ८,००,०००/– इतकी आहे. फ्रीशीप साठी उत्पन्न मर्यादा नाही.
या योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे पुढील प्रमाणे.

१) पासपोर्ट साईज फोटो (फक्त शिष्यवृत्ती योजनेसाठी)
२) मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचे गुणपत्रक
३) विद्यार्थ्यांचा जातीचा दाखला (तहसील कार्यालयातील)
४) पालकांचा (वडीलांचा) उत्पन्न दाखला – सन २०२२–२३ चा आवश्यक आहे.

(खाजगी अगर सरकारी निमसरकारी नोकरी करणाऱ्या पालकांनी नोकरीच्या ठिकाणचे कार्यालयातील वार्षिक उत्पन्न दाखला आणावा तर शेती, मजुरी किंवा अन्य व्यवसाय करणाऱ्या पालकांनी तहसीलदार कार्यालयातीलच उत्पन्नाचा दाखला आणावा.)

५) आधारकार्डाची झेरॉक्स
६) इ. १० वी च्या गुणपत्रकाची झेरॉक्स.
७) इ. १२ वी च्या गुणपत्रकाची झेरॉक्स.
८) वडील हयात नसल्यास आईचा उत्पन्नाचा दाखला व वडीलांचा मृत्युचा दाखला.
९) वडील व आई दोन्ही हयात नसल्यास पालकांचा उत्पन्न दाखला व आई – वडीलांचा मृत्यु दाखला.

वरील योजनेचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रवेश अर्ज घेताना वरील अत्यावश्यक मूळ कागदपत्रे दाखवून शिष्यवृत्ती अगर फ्रीशिपच्या अर्जाची मागणी करावी व अर्ज सादर करताना वरील कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती (सत्यप्रती) जोडाव्यात. शासनाकडून जाहीर होणाऱ्या वेळापत्रकाप्रमाणे शासनाच्या वेबसाईटवर शिष्यवत्ती/फ्रीशीप अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावेत. व त्यांची प्रत महाविद्यालयात कागदपत्रांसहीत जमा करावी. (यासंदर्भात महाविद्यालयातील नोटीस बोर्डावर प्रदर्शित होणाऱ्या नोटीसा पहाव्यात.)

ब) शासनाच्या अन्य विविध शिष्यवृत्ती :–
१) राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती (National Merit Scholarship)

Wherever Applicable : (आवश्यकतेनुसार भरावे लागणारे शुल्क)

| Sr. No. | PARTICULARS | RS. |
|---|---|---|
| 01 | Admission Form Fee | 100.00 |
| 02 | Transfer Certificate Fee | 100.00 |
| 03 | Bonafied Certificate Fee | 50.00 |
| 04 | No Objection Certificate Fee | 50.00 |
| 05 | Duplicate I Card Fee | 100.00 |
| 06 | Duplicate Mark List Fee | 100.00 |

REFUND OF FEES

Refund & Fees as per University & Mumbai circular UG/412/ of 2008 dated 11.9.2008

**शिष्यवृत्ती आणि अन्य शुल्क सवलती :-**

महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकारच्या अनेक शिष्यवृत्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. त्याशिवाय महाविद्यालयातमार्फत व गावातील दानशूर शिक्षणप्रेमी व्यक्तिंकडून अनेक शिष्यवृत्या व आर्थिक मदत मिळते. त्यातील काही पुढीलप्रमाणे आहेत.

अ) शासनाच्या शिष्यवृत्यांबाबत :–

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती अंतर्गत पात्र विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी शासन निर्णय संकिर्ण/२०१७/प्र.क्र./३३२/तासि/४ दि. ७/१०/२०१७ अन्वये ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. त्यासाठी उत्पन्न दाखला, गुणपत्र, आधारकार्ड, अधिवास दाखला इ. आवश्यक आहे. तर उत्पन्न मर्यादा रु. ८,००,०००/– इतकी आहे.

२) स्वातंत्र्य सैनिकांच्या (Freedom Fighter) मुलांना मिळणाऱ्या शिष्यवृत्या व नादारी.

३) पूर्वी व आता लष्करात असणाऱ्यांच्या मुलांना मिळणाऱ्या शिष्यवृत्या व फी माफी (Jawan Scholarships)

४) माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती :– या सवलतीस पात्र होण्यासाठी विद्यार्थ्यांनी मा. सचिव, माजी सैनिक मंडळ, रत्नागिरी यांचेकडून पात्रता प्रमाणपत्र मिळवणे आवश्यक आहे. अर्जासोबत पात्रता प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

५) प्राथमिक / माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या मुलांना खास शिष्यवृत्त्या मिळू शकतात. मात्र यासाठी किमान ६० टक्के गुणांची आवश्यकता असते.

६) मागासलेल्या जाती–जमातीच्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्ती व सवलती :– (भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती / फ्री शिप योजना (मागास व इतर मागास वर्गीय जातीच्या विद्यार्थ्यांसाठी) मागास (SC/ST/VJNT/SBC) तसेच इतर मागासवर्गीय (OBC) प्रवर्गामध्ये येणाऱ्या सर्व जातीच्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.

२) राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती (Govt. Open Merit Scholarship)

३) अपंग शिष्यवृत्ती

४) जिल्हा परिषदेची राष्ट्रीय शिष्यवृत्ती

५) आर्थिकदृष्टया मागासवर्गीय गुणवत्ता शिष्यवृत्ती

६) एकलव्य आर्थिक सहाय्य योजना

७) केंद्र शासनाची अल्पसंख्यांक गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना :

या योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे सन २०२३–२४ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न २,००,०००/– पेक्षा जास्त असू नये. पाल्याची मागील वर्षाची गुणवत्ता ५० टक्के पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

कोणत्याही विद्यार्थ्यास एकाचवेळी एकापेक्षा जास्त शासनाच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेता येत नाही. इ.बी.सी., पी.टी.सी., एस.एस.टी.सी., माजी सैनिक, अपंग व भारत सरकार शिष्यवृत्ती आदी सवलती घेणाऱ्या विद्यार्थ्यांची हजेरी व परीक्षेमधील प्रगती समाधानकारक नसेल तर महाविद्यालयास अशांची सवलत रद्द करण्याची शिफारस शासनास करावी लागेल. अशा प्रकारे सवलत रद्द झाल्यास व त्या विद्यार्थ्याला परिक्षेस बसता न आल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयावर राहणार नाही व त्यांना संपूर्ण वर्षाची फी भरावी लागेल, याची नोंद घ्यावी.

अनुसूचित जाती (SC) / अनुसूचित जमाती (ST) रु. ८,००,०००/– उत्पन्न मर्यादा शिष्यवृत्ती व त्यावरील उत्पन्न असल्यास फ्रीशीप साठी पात्र

इमाव, एन.टी., एस.बी.सी. रु. १,००,०००/– उत्पन्न मर्यादा शिष्यवृत्ती व रु. ६,००,०००/– पर्यंत उत्पन्न असल्यास फ्री शीप प्राप्त होते.

- **प्रत्येक प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थीनीने आपले नाव मतदार यादीमध्ये नोंदविणे अत्यावश्यक आहे व नोंदविले असल्यास ओळखपत्राची सत्यप्रत प्रवेशाच्या वेळी सादर करावी.**
- **सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनी यांची आपल्या आधार ओळखपत्राची सत्यप्रत सादर करणे अत्यावश्यक आहे.**
- **सर्व विद्यार्थ्यांनी शाळा सोडलेल्या दाखल्यावरील जन्मतारीख व नाव हे आधारकार्डवर त्याचप्रमाणे असेल याची खात्री करून घ्यावी नसेल तर त्याप्रमाणे आवश्यक ते बदल करून घ्यावेत.**

**विद्यार्थी व पालक यांनी घ्यावयाच्या महत्वाच्या नोंदी :-**

**प्रवेशासंबंधी**

एफ.वाय./एस.वाय./टी.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एससी. मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पुनर्प्रवेशाचा अधिकार हा सर्वस्वी महाविद्यालयाचा आहे.

महाविद्यालय सुरू झाल्यापासून जागा शिल्लक असल्यास व हजेरी भरत असल्यास १ महिन्याच्या आत प्रवेश दिला जाईल. त्या नंतर प्रवेश देता येणार नाही.

**विषय बदलण्यासंदर्भात**

विद्यार्थ्याने एकदा घेतलेला विषय बदलायचा असल्यास मा. प्राचार्य यांची ३१ जुलै पूर्वी लेखी परवानगी घ्यावी. याशिवाय टी.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एससी ला विषय निवडताना विद्यार्थ्यांनी संबंधित विषयांच्या विभाग प्रमुखांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच घेतलेले विषय बदलायचे झाल्यास पूर्वीच्या व नंतरच्या दोन्ही विषयांच्या विभाग प्रमुखांची लेखी परवानगी घ्यावी व प्रवेश अर्जावर तशी नोंद करून घ्यावी.

१) एखाद्या विद्यार्थ्यास कॉलेज सोडावयाचे झाल्यास त्यास कॉलेज सोडण्याबद्दल रीतसर अर्ज द्यावा लागेल. मात्र पहिल्या सत्रात त्याने अर्ज केल्यास, पहिल्या सत्राची पूर्ण फी भरावी लागेल. त्याच प्रमाणे दुसरे सत्र सुरू झाल्यानंतर अर्ज केल्यास दोन्ही सत्रांची फी भरावी लागेल.

२) वर्षभर कॉलेजमध्ये नियमित उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यास शासकीय फी सवलत मंजूर होते. प्रथम किंवा द्वितीय सत्रात कॉलेज सोडणाऱ्या विद्यार्थ्यास कोणतीही फी सवलत मंजूर होत नाही. अशावेळी संबंधित विद्यार्थ्यास पूर्ण फी रोख स्वरूपात भरावी लागेल.

३) शासनाने एखाद्या विद्यार्थ्यास फी माफीचा अर्ज नामंजूर केल्यास ती फी संबंधित विद्यार्थ्यास रोख स्वरूपात भरावी लागेल.

**पत्रव्यवहारासंबंधी :**

विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी महाविद्यालयाशी पत्रव्यवहार करताना विद्यार्थ्याचा वर्ग, रोल नंबर व वर्ष पत्रात नमूद करावे. त्याशिवाय विद्यार्थ्या बाबतची माहिती शोधणे शक्य होणार नाही.

**ओळखपत्र :**

१) महाविद्यालयाच्या आवारात असताना प्रत्येक विघार्थ्याजवळ त्याचे स्वत:चे ओळखपत्र असणे व त्याने ते गळयात घालणे आवश्यक आहे. ओळखपत्र न आढळल्यास रू. ५०/– प्रती दिन दंड आकारला जाईल.

३) ओळखपत्र प्रथम घेताना रू. ५०/– शुल्क घेतले जाईल. विद्यार्थ्यांनी ओळखपत्र जपून ठेवावे. पहिले ओळखपत्र हरविल्यास दुसरे ओळखपत्र घेताना शुल्क रू. १०० पडेल. ओळखपत्रावर मा. प्राचार्यांची सही घ्यावी. त्याशिवाय ते अधिकृत मानले जाणार नाही.

**वर्तणूक व शिस्त :**

विद्यार्थ्यांनी वेळापत्रकाप्रमाणे आपापल्या विषयांच्या सर्व तासिकांना व प्रयोगांना वेळेवर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. वर्गात प्रतिदिनी व प्रत्येक तासाला उपस्थिती घेतली जाईल. अपरिहार्य कारणास्तव जर उपस्थित राहता येत

नसेल तर संबंधित प्राध्यापकांना व कार्यालयास अगोदर कळविले पाहिजे. जर एखादा विद्यार्थी कारणाशिवाय वरचेवर अनुपस्थित राहू लागला तर त्याचा गंभीरपणे विचार केला जाईल. अपुरी उपस्थिती, गैरवर्तणूक व असमाधानकारक प्रगतीमुळे त्याला परीक्षेला बसण्याची परवानगी नाकारण्यात येईल आणि फी सवलत रद्द करण्यात येईल.

विद्यार्थ्यांनी दररोज महाविद्यालयातील सूचना–फलक वाचणे आवश्यक आहे.

परीक्षेत कोणत्याही प्रकारे गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी या महाविद्यालयात प्रवेश देणे अथवा नाकारणे प्राचार्यांच्या अखत्यारीत राहील.

सर्व विद्यार्थ्यांनी गृहपाठ, प्रयोगवही वगैरे नियमानुसार पूर्ण केले पाहिजेत. महाविद्यालयातील सर्व चाचणी परीक्षांना बसले पाहिजे. याबाबतीत चुकारपणा केल्यास होणाऱ्या नुकसानीस महाविद्यालयास जबाबदार असणार नाही.

महाविद्यालयाच्या आवारात नियमबाहय वर्तन करणाऱ्या, तसेच महाविद्यालयाच्या कोणत्याही मालमत्तेची नासधूस करणाऱ्यांना कडक शासन केले जाईल. हे शासन वैयक्तिक, सामुहिक दंडाचे स्वरूपात असेल किंवा जनरल ब्रेकेजच्या स्वरूपात असेल. अनामत परत करताना जनरल ब्रेकेज वसूल केले जाईल. अतिगंभीर गैरवर्तनाबद्दल विद्यार्थ्याला महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.

महाविद्यालयात व महाविद्यालयाचे परिसरात भ्रमणध्वनी वापरास सक्त मनाई आहे. कोणताही विद्यार्थी महाविद्यालयात व महाविद्यालयाचे परिसरात भ्रमणध्वनी वापरताना आढळल्यास त्याचा भ्रमणध्वनी जप्त करून त्याच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल.

महाविद्यालयातील शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, संस्थेचे पदाधिकारी व समाजातील नागरीक यांच्याबरोबर विद्यार्थ्यांनी नम्रतेने वागले पाहिजे.

शासन व विद्यापीठाचे सध्या अस्तित्वात असलेले व वेळोवेळी जाहीर होणारे सर्व नियम प्रत्येक विद्यार्थ्यास बंधनकारक राहतील.

सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात संस्कारित आणि शिस्तबध्द वर्तणूक ठेवणे अनिवार्य आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्या सूचना/तक्रारी मांडण्यासाठी ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या ''सूचना पेटी'' चा उपयोग करावा. आपली सूचना सुस्पष्ट असावी. निनावी सूचनांचा विचार केला जाणार नाही.

प्रथम व व्दितीय सत्रातील सर्व शैक्षणिक कामकाजाची पूर्तता झाल्यानंतर परीक्षेपूर्वी सर्व विद्यार्थ्यांना ग्रंथालय, रा. से. योजना, क्रीडा विभाग, विस्तार विभाग व संबंधित विषय शिक्षकांकडून अपेक्षित कार्याची पूर्तता योग्य पध्दतीने केली असल्याबद्दल ना हरकत दाखल्यावर सही घेणे आवश्यक आहे. सही मिळाली नसेल तर विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी बसण्यास हॉल तिकीट उपलब्ध होत नाही. या साठी आपला ना हरकत दाखला वेळेवर पूर्ण होईल हे पहाणे सर्वस्वी विद्यार्थ्यांची जबाबदारी राहील. परीक्षेच्या काळात ग्रंथालयातील पुस्तके वापरणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपली परीक्षा संपल्यावर त्वरीत पुस्तके ग्रंथालयात जमा करावीत अन्यथा त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

सहल :– महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या सहभागा शिवाय सहलीस मान्यता असणार नाही. शैक्षणिक सहल

आयोजित करताना प्राचार्यांची पूर्व परवानगी घेतली पाहिजे. तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनींनी पालकांची लेखी संमती आणणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

आपल्या वर्तनामुळे कुणाच्याही वैयक्तिक व धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत याची सर्व विद्यार्थ्यांनी दक्षता घ्यावी.

**उपस्थिती बाबतचे नियम :**

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींना विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे व्याख्याने, अभ्यासपाठ तसेच प्रत्येक सत्रात होणारी परीक्षा, वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या चाचण्या या सर्वांना नियमितपणे उपस्थित रहावे लागेल. महाविद्यालयात प्रत्येक तासाला विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची नोंद केली जाते. महिन्याला प्रत्येक विषयाला झालेल्या एकूण तासांच्या १/४ पेक्षा जास्त तासांना गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची अनियमित विद्यार्थी म्हणून नोंद घेतली जाते. अशा पद्धतीने अनेक विषयांत वारंवार अनियमित असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना संपर्क करून पाल्याच्या असमाधानकारक उपस्थितीची जाणीव दिली जाते व दंडात्मक कारवाई करण्यात येते. यानंतरही उपस्थितीत व गुणवत्तेत सुधारणा न आढळल्यास विद्यापीठ नियमानुसार संबंधित विद्यार्थ्यांवर कारवाई केली जाईल. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने सर्व तासांना आपली नियमित हजेरी राहील, याची खबरदारी घ्यावी.

मुंबई विद्यापीठाने उपस्थितीसंबंधी केलेले अध्यादेश (Ordinance) ६०८६ सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहतील याची नोंद घ्यावी.

**अभ्यासानुवर्ती उपक्रम :-**

मागील बावीस वर्षात महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच मंडणगड तालुक्याच्या सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. महाविद्यालयात विविध विभागांमार्फत राबविले जाणारे अनेक अभ्यासानुवर्ती व अभ्यासेतर उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक प्रकारच्या संधी उपलब्ध करून देतात. याचा लाभ घेवून दरवर्षी अनेक विद्यार्थी–विद्यार्थिनी विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावरील सन्मानास पात्र ठरतात. या विविध उपक्रमांसंबंधिच्या सूचना महाविद्यालयाच्या सूचना फलकात वेळोवेळी प्रदर्शित केल्या जातात. विद्यार्थ्यांनी या सूचना वेळीच वाचून आपला सर्वांगीण विकास करण्यासाठी या विविध उपक्रमांत सहभागी होणे आवश्यक आहे.

कै. विजया सदाशिव पाटणे ग्रंथालय

मानवी जीवनात ग्रंथांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासाकरीता अभ्यासक्रमाशी संबंधित व विविध विषयांची संदर्भ पुस्तके तसेच इंग्रजी व मराठी वृत्तपत्रे, विविध नियतकालिकेही उपलब्ध आहेत. ग्रंथालय नियमावली व कार्यपध्द्तीनुसार विद्यार्थी या सुविधेचा लाभ घेवू शकतात. ग्रंथालयाचे कामकाज सकाळी ८.०० ते सायं. ५.०० पर्यंत सुरू असते. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढीची योजना राबविली जाते. ग्रंथालयामध्ये अभ्यासक्रमासंबंधी पुस्तकांबरोबरच विविध विषयातील संदर्भ ग्रंथ, विश्वकोश तसेच विविध स्पर्धा–परीक्षांसाठी उपयुक्त असणारे ग्रंथ विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले जातात.

संबंधित विद्यार्थ्यांनी आपली प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यावर याबाबत ग्रंथपालांशी संपर्क साधावा. या

योजनेसाठी मर्यादित पुस्तके असल्याने प्रथम येणाऱ्यास प्राधान्य दिले जाईल.

ग्रंथालय सेवेचा लाभ माजी विद्यार्थी तसेच अभ्यासक यांनाही मा. प्राचार्य व ग्रंथपाल यांच्या पूर्व परवानगीने घेता येतो.

ग्रंथालयात नांव नोंदणीसाठी महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याची पावती, फोटो, पूर्ण पत्ता, स्वतःची सही, इ. सर्व तपशील पूर्णपणे भरलेले ओळखपत्र इत्यादी गोष्टींची पूर्तता करावी. त्यानंतरच विद्यार्थ्यांचे पुस्तक देव-घेव कार्ड (Borrowers Card) तयार करून त्याच्या नावाची नोंदणी केली जाईल. सर्व विद्यार्थ्यांनी हे कार्ड तयार करून घेणे अत्यावश्यक आहे.

**सांस्कृतिक विभाग :-** (Cultural Dept.)

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करून त्यांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्‌देशाने महाविद्यालयात विविध सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. सांस्कृतिक विभाग व अन्य अभ्यासमंडळामार्फत विविध प्रसंगी भित्तीपत्रकांचे प्रदर्शन केले जाते.

**राष्ट्रीय सेवा योजना :-** (N.S.S.)

महाविद्यालयाच्या स्थापना वर्षापासून महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यरत आहे. श्रम प्रतिष्ठा, संस्कार व नीतीमूल्ये यांची शिकवण या विभागामार्फत सातत्याने देण्यात येत आहे. गेल्या वीस वर्षात या विभागाने समाज प्रबोधन व जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविले आहेत. विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणिवेचे एक महत्वपूर्ण व्यासपीठ म्हणून हा विभाग कार्यरत आहे. दोन वर्षात यशस्वीपणे सर्व उपक्रम राबविणाऱ्या विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेत १० गुण जादा मिळतात.

**आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग :-** (DLLE)

राष्ट्रीय सेवा योजनेप्रमाणेच महाविद्यालयात विस्तार शिक्षण विभाग (Dept. of Life long Learning & Extension) कार्यरत असून या विभागामार्फत विद्यार्थी व समाजोपयोगी विविध उपक्रम राबविले जातात. वर्षभरात यशस्वीपणे उपक्रम राबविणाऱ्या विद्यार्थ्यांना १० गुण जादा मिळतात.

**'गरूडभरारी' वार्षिकांक :-** (College Annual Magazine)

अध्ययन-अध्यापनाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना प्रोत्साहन देण्याचे कार्य महाविद्यालयात केले जाते. विद्यार्थ्यांमधील सुप्त सृजनशक्तीला प्रेरणा देऊन त्यांच्या साहित्यिक कलाकृतींना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य या विभागामार्फत केले जाते.

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :-** (Compitative exam Guidance Center)

आधुनिक युगात स्पर्धा परीक्षांना अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे. सध्याच्या स्पर्धेच्या युगात व्यावसायिक आणि उच्च अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी तसेच विविध क्षेत्रात रोजगार मिळविण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षा द्याव्या लागतात. परंतु पुरेशी तयारी नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक वेळा यश मिळत नाही. या सर्वांचा गांभीर्याने विचार करून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्पर्धा-परीक्षांचे महत्व समजावून सांगितले जाते व विविध स्पर्धा-परीक्षांना बसण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जाते.

**स्टाफ ॲकॅडमी :-** (Staff Academy)

प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांवर व्याख्याने व आवश्यकतेनुसार तज्ञांचे मार्गदर्शन या विभागामार्फत आयोजित केले जातात.

**सहल विभाग :-** (Educational Tour)

विद्यार्थ्यांना केवळ चार भिंतींच्या आतले शिक्षण न देता जिज्ञासा दृष्टीने बाहेरील जग न्याहाळता यावे या उद्देशाने या विभागामार्फत विविध सहलींचे आयोजन करण्यात येते.

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ :-** (Annual Prize Distribution Ceremony)

शैक्षणिक वर्षामध्ये झालेल्या विविध परीक्षा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद, एन.एस.एस., वार्षिक क्रीडा स्पर्धा इत्यादींमध्ये प्राविण्य संपादन केलेल्या गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना पारितोषिक प्रदान करण्यासाठी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात येते. यावेळी विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रमही सादर केला जातो.

**निसर्ग मंडळ:-** (Nature Club)

पर्यावरणाचा समतोल राखणे ही आज काळाची गरज बनली आहे. त्यादृष्टीने पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी महाविद्यालयीन युवकांना प्रेरित करण्याचे कार्य या विभागामार्फत केले जाते. विश्व प्रकृति निधी (W.W.F ) शी संलग्न असणाऱ्या या विभागामार्फत वेळोवेळी विविध उपक्रम राबविण्यात येतात.

**मराठी भाषा व वाङ्:मय मंडळ :-** (Marathi Language & Literature Board)

विद्यार्थ्यांच्या वाङ्:मयीन कलाकृतींना या विभागामार्फत व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते व त्यांची भाषिक जाणीव समृध्द् केली जाते.

**क्रीडा विभाग :-** (Sports Dept.)

महाविद्यालयीन व विद्यापीठीय विविध क्रीडा-स्पर्धामध्ये सहभाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांना या विभागामार्फत प्रोत्साहन दिले जाते. विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास विद्यापीठ नियमानुसार अंतिम परीक्षेत दहा गुण जादा मिळतात.

**रोजगार मार्गदर्शन विभाग :-** (Carrier Guidance Dept.)

या विभागामार्फत विविध क्षेत्रांमध्ये उपलब्ध असणाऱ्या रोजगारांबाबत मार्गदर्शन केले जाते. वर्तमानपत्रांतील रोजगार-विषयक जाहिराती वेळोवेळी काच -फलकात प्रदर्शित केल्या जातात.

**भित्तीपत्रके :-** (Wall papers)

महाविद्यालयामध्ये मराठी, हिंदी, इतिहास, अर्थशास्त्र, पर्यावरणशास्त्र आदी विभागांसाठी स्वतंत्र व्यवस्था असून त्याव्द्ारे वेळोवेळी आपापल्या विषयांची भित्तिपत्रके प्रसिध्द् केली जातात.

**इतिहास अभ्यास मंडळ :-** (College History Study call)

मंडणगड आणि परिसराला लाभलेला समृध्द इतिहास पाहता वारसा जतन, संस्कृती संवर्धन, गतइतिहासाचा अभिमान यासाठी इतिहास अभ्यासमंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

**हिन्दी मंडळ :-** (Dept. og Hindi)

हिन्दी या राष्ट्रभाषेचा प्रचार व प्रसार यासाठी हिन्दी मंडळाची स्थापना करण्याल आलेली आहे.

**कॉमर्स असोसिएशन :-** (Commerce Association)

सध्याच्या युगात कॉमर्सला आलेले महत्व, कॉमर्सच्या विविध शाखांमधील संधी, बँकिंग इ. विषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण व्हावी या हेतून कॉमर्स असोसिएशनची स्थापना करण्यात आली आहे.

**विद्यार्थी मंडळ -** (Student Council )

## संक्षिप्त वार्षिक नियोजन

| महिना | तपशील |
|---|---|
| जून – | प्रथम सत्र प्रारंभ – दि. १३ जून २०२३.<br>नवीन विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ, ओळखपत्र पूर्तता, ग्रंथालय कार्ड काढणे, शैक्षणिक कामकाजास सुरुवात. |
| जुलै – | राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे उद्घाटन. राजर्षि शाहू महाराज जयंती, विविध उपक्रमांचा शुभारंभ, प्रथम वर्ष कला / वाणिज्य / विज्ञान एनरोलमेंट फॉर्म पूर्तता करणे, शिष्यवृत्तीचे सर्व फॉर्म पूर्तता करणे.(Online) |
| ऑगस्ट – | लो. टिळक पुण्यतिथी, वादविवाद मंडळ उद्घाटन, तृतीय वर्ष कला वर्गाच्या विद्यार्थ्यांचे प्रकल्पविषय निश्चित करणे. स्वातंत्र्य दिन, वर्षा सहल. विद्यार्थी मंडळ व सचिवपदाची निवडणूक, क्रांतिदिन. |
| सप्टेंबर – | शिक्षक दिन, विद्यापीठीय क्रीडा–स्पर्धामध्ये सहभाग, प्रथम सत्रांत परीक्षा फॉर्म भरणे, कर्मवीर भाऊराव पाटील जयंती, रा. से. यो. विभागाचे विविध उपक्रम. |
| ऑक्टोबर– | महात्मा गांधी जयंती, प्रथम व तृतीय सत्रांत परीक्षा, |
| नोव्हेंबर – | व्दितीय सत्र प्रारंभ नोव्हेंबर २०२३.<br>प्रथम व तृतीय सत्रांत परीक्षेचा निकाल.<br>महात्मा फुले स्मृतिदिन, तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म भरणे. |
| डिसेंबर – | डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन. तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांचे प्रकल्प पूर्ण करून सादर करणे, वार्षिक क्रीडा स्पर्धा व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ, रा.से.यो. मार्फत श्रमसंस्कार निवासी शिबीर. |
| जानेवारी– | वार्षिक सहल, प्रजासत्ताक दिन, प्रथम वर्ष कला / वाणिज्य / विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांचे एनरोलमेंट कन्फरर्मेशन, सावित्रीबाई फुले जयंती. |
| फेब्रुवारी – | मराठी भाषा दिन, तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांची पूर्वपरीक्षा |
| मार्च – | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिन. |
| एप्रिल – | तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ, व्दितीय व चतुर्थ सत्रांत परीक्षा |
| एप्रिल – | तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा सुरू. व्दितीय व चतुर्थ सत्रांत परीक्षेचा निकाल.<br>व्दितीय सत्र समाप्ती दि. ०१.०५.२०२४. |

## विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध विविध सोयी-सुविधा

**१. विद्यार्थिनी वसतिगृह :-** (Girls Hostel) महाविद्यालयाची स्वत:ची वसतिगृह सुविधा नसली तरी महाविद्यालयापासून जवळच असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय शासकीय वस्तीगृहात विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देण्यासाठी महाविद्यालयामार्फत विशेष प्रयत्न केले जातात. महाविद्यालयाच्या आवारात मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह मागील शैक्षणिक वर्षापासून प्रारंभीत झालेले आहे.

**२. लेडीज रूम :-** (Ladies Room) – विद्यार्थिनींसाठी महाविद्यालयात सर्व सोयींसह स्वतंत्र लेडीज रूम उपलब्ध आहे.

**३. जिमखाना व क्रीडांगण :-** (Gymkhana & Play Ground)
विद्यार्थ्यांसाठी खेळांच्या सर्व साहित्यांसह स्वतंत्र जिमखाना इमारत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. मैदानी खेळांसाठी प्रशस्त क्रीडांगण तयार करण्यात आले आहे.

**४. वाहनतळ :-** (vehicle Parking) महाविद्यालयाने पार्किंगची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

**५. युवा रक्षा विमा योजना :-** (Yuva Raksha Group Insurance Scheme)
मुंबई विद्यापीठ व नॅशनल इन्श्युरन्स कंपनी यांच्यामध्ये झालेल्या कराराप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा विमा उतरविण्यात येतो.

**६. सूचना पेटी :-** (Complaint Box) विद्यार्थ्यांकडून सूचना व अडचणी मागविण्यासाठी ग्रंथालयात सूचना पेटी ठेवण्यात आली आहे. तर विद्यार्थिनींच्या अडचणी व तक्रारी यासाठी महिला विकास कक्षांतर्गत स्वतंत्र सूचनापेटी ठेवण्यात आलेली आहे.

**७. एस. टी. पासबाबत मार्गदर्शन :-** बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना सुलभतेने एस.टी.पास मिळावा, यासाठी महाविद्यालय विशेष प्रयत्न करते. तसेच विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी गाडयांच्या वेळापत्रकामध्ये बदल करण्याची विनंती एस.टी. व्यवस्थापक/आगार प्रमुखांना करण्यात येते. शासनाच्या निर्देशाप्रमाणे प्रत्येक महिन्यात महापुरुष/राष्ट्रपुरुष यांच्या जयंती व पुण्यतिथी चे कार्यक्रम संपन्न होतात.

**८. बॉईज रूम :–** (Boys Room)

**९. ए.व्ही. रूम :-** (Audio - Visual Room)

**महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी समिती –** (College Alumini Association)

आपल्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळेच महाविद्यालयातून पदवी संपादन करून बाहेर पडलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी आपापल्या क्षेत्रात नावलौकिक मिळविला आहे. महाविद्यालयाचे अनेक माजी विद्यार्थी आज प्राथमिक, माध्यमिक, कला तसेच उच्च माध्यमिक शिक्षक तसेच वकील, उद्योजक, एम.बी.ए., एम.एस.डबल्यू., व्यावसायिक, संगणक प्रशिक्षक, सैन्य दल, सीमा सुरक्षा दल, कर सल्लागार, विमा प्रतिनिधी म्हणून यशस्वीपणे कार्यरत आहेत. क्रीडा क्षेत्रात काही विद्यार्थ्यांनी कबड्डी पटू व आंतरराष्ट्रीय योगापटू म्हणून ख्याती प्राप्त केलेली आहे. महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटनेची स्थापना झालेली असून त्यांच्या मार्फत वेळोवेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालय अथवा माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष ॲड. अभिजीत गांधी, (मो. नं.९२२६९९९३७७/७२७६१३७४३३) यांचेशी संपर्क साधावा.

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे

# लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

मंडणगड, जि. रत्नागिरी – ४१५२०३

## विद्यमान संचालक मंडळ (२०२२-२०२७)

**संस्थापक अध्यक्ष - कर्मवीर भि. रा. तथा दादा इदाते**

| अनु. | नाव | पद | ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१ | सौ. संपदाताई प्रेमकुमार पारकर | अध्यक्ष | दापोली |
| ०२ | श्री. सहदेव शिवराम रसाळ | उपाध्यक्ष | बोरीवली |
| ०३ | श्री. श्रीराम भिकू तथा भाऊ इदाते | कार्याध्यक्ष | जालगांव |
| ०४ | श्री. सतीश रामचंद्र शेठ | कार्यवाह | दापोली |
| ०५ | श्री. विश्वदास हरिश्चंद्र लोखंडे | सहकार्यवाह | मंडणगड |
| ०६ | श्री. रवींद्रकुमार राजपती मिश्रा | कोषाध्यक्ष | मंडणगड |
| ०७ | श्री. सुनिल रामदास मेहता | सहकोषाध्यक्ष | मंडणगड |
| ०८ | श्री. आप्पासाहेब सखाराम आयरे | सदस्य | दोपाली |
| ०९ | श्री. संतोष अनंत चव्हाण | सदस्य | मंडणगड |
| १० | श्री. आदेश मधुकर मर्चंडे | सदस्य | मंडणगड |
| ११ | श्री. अजित बाळकृष्ण आंब्रे | सदस्य | मुंबई |
| १२ | श्री. राजेंद्र वसंत चव्हाण | सदस्य | जालगांव |
| १३ | श्री. हसमुख गहरीलाल जैन | सदस्य | दापोली |
| १४ | श्री. वैभव राम कोकाटे | सदस्य | मंडणगड |
| १५ | श्री. उदय विजय भागवत | सदस्य | दाभिळ–दापोली |
| १६ | श्री. मयुरेश मिलिंद शेठ | सदस्य | जालगांव |
| १७ | श्री. अथर्व विवेक इदाते | सदस्य | जालगांव |

## महाविद्यालय विकास समिती (सी. डी. सी.)
## (२०२२ ते २०२७)

| | | |
|---|---|---|
| ०१ | श्री. श्रीराम भिकू इदाते | कार्याध्यक्ष |
| ०२ | श्री. सतीश रामचंद्र शेठ | कार्यवाह |
| ०३ | श्री. विश्वदास हरिश्चंद्र लोखंडे | संस्था प्रतिनिधी |
| ०४ | श्री. आदेश मधुकर मर्चंडे | संस्था प्रतिनिधी |
| ०५ | श्री. वैभव राम कोकाटे | संस्था प्रतिनिधी |
| ०६ | श्री. गिरीश गणेश जोशी | संस्था प्रतिनिधी |
| ०७ | श्री. संजयकुमार मुंजाजीराव इंगोले | शिक्षक प्रतिनिधी |
| ०८ | डॉ. संगिता आनंदराव घाडगे | शिक्षक प्रतिनिधी |
| ०९ | डॉ. विनोदकुमार धनंजय चव्हाण | शिक्षक प्रतिनिधी |
| १० | श्री. सचिन कृष्णा थोरे | शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी |
| ११ | डॉ. वाल्मिक दगडू परहर | सेवा जेष्ठ सहा. प्राध्यापक |
| १२ | डॉ. शामराव जालिंदर वाघमारे | समन्वयक आय.क्यू.ए.सी. |
| १३ | डॉ. राहूल नाशिकराव जाधव | प्राचार्य तथा सचिव |

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे

**लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

मंडणगड, जि. रत्नागिरी – ४१५२०३

प्राचार्य

प्रो. डॉ. राहुल नाशिकराव जाधव एम.एस्सी.,पीएच.डी.

**सहाय्यक प्राध्यापक (वरिष्ठ महाविद्यालय)**

**कला शाखा -**

| | | |
|---|---|---|
| **मराठी विभाग** | :- | **श्री. संजयकुमार इंगोले,** एम.ए.,सेट.,नेट. |
| | | **डॉ. धनपाल कांबळे,** एम.ए.,एम.फिल.,पीएच.डी., सेट.,नेट |
| **हिंदी विभाग** | :- | **डॉ. अशोक साळुंखे,** एम.ए.,एम.फिल.,पीएच.डी.,सेट |
| **इंग्रजी विभाग** | :- | **डॉ. शामराव वाघमारे,** एम.ए.,पीएच.डी. |
| **इतिहास विभाग** | :- | **डॉ. ज्योती पेठकर,** एम.ए.,पीएच.डी. |
| **भूगोल विभाग** | :- | **श्री. हनुमंत सुतार,** एम.ए. |
| **अर्थशास्त्र विभाग** | :- | **डॉ. भरतकुमार सोलापुरे,** एम.ए.,पीएच.डी.,सेट |
| | | **डॉ. वाल्मिक परहर,** एम.ए.,एम.फिल.,पीएच.डी. |
| **पर्यावरणशास्त्र आणि पायाभूत अभ्यासक्रम विभाग** | :- | **डॉ. विष्णू जायभाये,** एम.ए.,एम.,फिल. |

**वाणिज्य शाखा - (Commerce Wing)**

| | | |
|---|---|---|
| **लेखाशास्त्र विभाग** (Accounting Dept.) | :- | **डॉ. पिलगुलवार पुरुषोत्तम बालाजी** एम.कॉम., पीएच.डी. |
| **वाणिज्य विभाग** (Commerce Dept.) | :- | **डॉ. रामदास देवरे,** एम.कॉम.,एम.फिल.पीएच.डी. |

**विज्ञान शाखा - (ScienceWing)**

| | | | |
|---|---|---|---|
| **रसायनशास्त्र** | (Chemestry) | :- | **डॉ. मुकेश कदम,** एम.एस्सी.,पीएच.डी., नेट |
| | | | **श्री. संदीप निर्वाण,** एम.एस्सी.,नेट |
| | | | **श्री. शरीफ काझी,** एम.एस्सी.,नेट |
| **भौतिकशास्त्र** | (Physics) | :- | **श्री. सूरज बुलाखे,** एम.एस्सी.,नेट |
| **वनस्पतीशास्त्र** | (Botany) | :- | **डॉ. संगीता घाडगे,** एम.एस्सी.,पीएच.डी. |
| | | | **डॉ. विनोदकुमार चव्हाण,** एम.एस्सी.,पीएच.डी. |
| **प्राणीशास्त्र** | (Zoology) | :- | **प्रो. डॉ. राहूल एन. जाधव,** प्राचार्य |
| | | | **डॉ. शैलेश भैसारे,** एम.एस्सी.,पीएच.डी. |
| **गणित** | (Mathematics) | :- | **डॉ. महेश कुलकर्णी** एम.एस्सी.,पीएच.डी. |
| **ग्रंथालय विभाग** | –(LibraryDept.) | :- | **श्री. दगडू जगताप (ग्रंथपाल),** एम.ए.,एम.लिब.,एम.फिल.(हिंदी),एम.फिल.(ग्रंथालयशास्त्र) (M.A., M.lib., M.Phil(Hindi), M.Phil (LibraryScience)) |

## लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मंडणगड.

## संचालक, महाविद्यालय, माजी विद्यार्थी, ग्रामस्थ व प्राध्यापक वर्गाकडून दिली जाणारी पारितोषिके

| | | |
|---|---|---|
| १. | प्रथम वर्ष कला वर्गात हिंदी विषयात सर्व प्रथम येणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी | रोख बक्षिस व प्रमाणपत्र |
| २. | व्दितीय वर्ष कला वर्गात अर्थशास्त्र विषयात प्रथम येणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी | रोख बक्षिस व प्रमाणपत्र |
| ३. | तृतीय वर्ष कला वर्गात अर्थशास्त्र विषयात प्रथम येणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी | रोख बक्षिस व प्रमाणपत्र |
| ४. | तृतीय वर्ष कला वर्गात इतिहास विषयात प्रथम येणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी | रोख बक्षिस व प्रमाणपत्र |
| ५. | तृतीय वर्ष कला वर्गात मराठी विषयात प्रथम येणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी | रोख बक्षिस व प्रमाणपत्र |
| | तृतीय वर्ष कला वर्गात ग्रामीण विकास विषयात प्रथम येणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी | रोख बक्षिस व प्रमाणपत्र |
| ६. | तृतीय वर्ष वाणिज्य वर्गात सर्व प्रथम येणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी | रोख बक्षिस व प्रमाणपत्र |
| ७. | तृतीय वर्ष वाणिज्य वर्गात अकौन्टन्सी विषयात प्रथम येणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी | रोख बक्षिस व प्रमाणपत्र |
| ८. | प्रा. इंद्रजित भालेराव सर्वोत्कृष्ट वाचक पारितोषिके | ग्रंथ व प्रमाणपत्र |
| ९. | आदर्श विद्यार्थी व विद्यार्थिनी पारितोषिक | चषक व प्रमाणपत्र |
| १०. | सर्वोत्कृष्ट खेळाडू विद्यार्थी/विद्यार्थिनी पारितोषिके | चषक व प्रमाणपत्र |
| ११. | सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा स्वयंसेवक व स्वयंसेविका पारितोषिके | चषक व प्रमाणपत्र |
| १२. | सर्वोत्कृष्ट श्रमदान करणारे दोन स्वयंसेवक व दोन स्वयंसेविका पारितोषिके | प्रमाणपत्र |
| १३. | विविध क्रीडा व सांस्कृतीक स्पर्धासाठीची पारितोषिके | प्रमाणपत्र |

## विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना

महाविद्यालयाच्या वतीने वेळोवेळी आयोजित करण्यात येणारे विविध प्रकल्प, शिबीरे, प्रात्यक्षिके, सहली तसेच बाहेरगांवी घेतले जाणाऱ्या विविध स्पर्धा शिबीरे, आदींमध्ये विद्यार्थ्यांना वैयक्तिक जबाबदारीवर सहभागी व्हावे लागेल. अशा वेळी एखादा अपघात किंवा दुर्घटना घडल्यास त्यास संस्था, विद्यापीठ, महाविद्यालय अथवा शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी जबाबदार रहाणार नाहीत. याची प्रत्येक विद्यार्थ्याने नोंद घ्यावी.

शासन व विद्यापीठ यांजकडून आलेल्या परिपत्रकाप्रमाणे महाविद्यालयात शैक्षणिक कामकाजाच्यावेळी वर्गात तसेच परिक्षेच्यावेळी मोबाईल बाळगू नये.

शै. वर्ष २०२३–२४ मध्ये वरीष्ठ महाविद्यालय शैक्षणिक कामकाजाची वेळ ही विद्यार्थी व व्यवस्थापनाच्या सोयीनुसार ठरविण्यात येईल व ती सर्वांना बंधनकारक असेल.

---

भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांना वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या शासन परिपत्रकाप्रमाणे ऑनलाईन अर्ज वेळेत भरुन त्याची प्रत कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांनी आधार कार्ड काढले असल्यास त्याची प्रत प्रवेश अर्जासोबत द्यावी.

"आपण मतदार यादीमध्ये आपले नाव नोंदविले आहे काय?"

शैक्षणिक वर्षामध्ये शासन किंवा विद्यापीठ यांजकडून परिपत्रक आल्यास अभ्यासक्रमासोबत एखादा नवीन आवश्यक अभ्यासक्रम पूर्ण करावयाचा असल्यास अथवा इतर कोणताही शैक्षणिक बदल झाल्यास त्या संदर्भात सूचना लावल्यानंतर विद्यार्थ्यांना त्याप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण करणे बंधनकारक राहिल.

**(अ) सार्वजनिक सुट्ट्या**

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | तारीख | वार |
|---|---|---|---|
| १. | बकरी ईद (ईद–उल–झुआ) | २८ जून २०२३ | बुधवार |
| २. | मोहरम | २९ जुलै २०२३ | शनिवार |
| ३. | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट २०२३ | मंगळवार |
| ४. | पारशी नववर्ष (शहेनशाही) | १६ ऑगस्ट २०२३ | बुधवार |
| ५. | गणेशचतुर्थी | १९ सप्टेंबर २०२३ | मंगळवार |
| ६. | ईद–ए–मिलाद | २८ सप्टेंबर २०२३ | गुरुवार |
| ७. | महात्मा गांधी जयंती | २ ऑक्टोबर २०२३ | सोमवार |
| ८. | दसरा | २४ ऑक्टोबर २०२३ | मंगळवार |
| ९. | दिवाळी (लक्ष्मीपुजन) | १२ नोव्हेंबर २०२३ | रविवार |
| १०. | दिवाळी (लक्ष्मीपुजन) | १४ नोव्हेंबर २०२३ | मंगळवार |
| ११. | गुरुनानक जयंती | २७ नोव्हेंबर २०२३ | सोमवार |
| १२. | ख्रिसमस | २५ डिसेंबर २०२३ | सोमवार |

हे केवळ माहिती पत्रकच नसून ही विद्यार्थ्यांची आचार संहिता आहे. ती विद्यार्थ्यांनी काटेकोरपणे पाळली पाहिजे म्हणजेच संपूर्ण यशाची खात्री देता येईल. संपूर्ण यश म्हणजे केवळ अभ्यासक्रमातील यश नव्हे तर चारित्र्याची घडण, उच्चध्येयवाद, शिस्त व कष्टाची तयारी याचाही यात समावेश होतो. स्वत:चे, संस्थेचे व समाजाचे भवितव्य उज्वल करण्यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या नियमांचे श्रध्देने पालन केले पाहिजे.

**प्राचार्य**
**लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला,**
**वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**
**मंडणगड, जि. रत्नागिरी.**

श्री वक्रतुंड प्रिंटींग प्रेस, दापोली.